Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# आदिवासी साहित्य: एक आकलन

**डॉ. सिंधू बाबाराव सोलापुरे**
मराठी विभाग प्रमुख,
श्री.आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रं.

आदिवासी हा संदर्भ असलेल्या मराठीतील ललित साहित्याच्या अभ्यासकक्षा 'दलित' जाणिवेच्या साहित्यापेक्षा वेगळ्या आहेत. अदिवासींच्या संदर्भातील भौगोलिक, सामाजिक, वांशिक व धार्मिक पृथकतेची जाणीव व्यक्त करणाऱ्या मराठी साहित्यास 'आदिवासी साहित्य' असे म्हणता येईल. थोडक्यात "आदिवासी" हा प्रतिपाद्य विषय आणि 'आदिवासी जाणीव' हा लेखकाच्या जीवनदृष्टीचा अविभाज्य भाग असलेल्या साहित्यास 'आदिवासी साहित्य' म्हणता येईल. तसे पाहिले तर मराठीत आदिवासींच्या जीवनावर स्वातंत्र्यपूर्वकाळापासून कथा कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. विशेषतः वारली, कातकरी, भिल्ल पावरी, गोंड, ठाकर आणि डांगी जमातींवर काही कथाकादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

आदिवासी साहित्याची संकल्पना स्पष्ट करताना असेही म्हणता येईल की, मराठी भाषेच्या संपर्कात आलेल्या अनेक जमाती आहेत, त्यांच्या स्वतंत्र भाषा आहेत, त्या भाषांमध्ये त्यांचे वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, गाणी व कथा आहेत. मराठी भाषेच्या संपर्कात येऊन बाह्य जगाच्या संदर्भात स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव आदिवासींना जशी आली तशीच समांतरपणे मराठी भाषिकांना आदिवासींच्या आदिम जीवनप्रवाहाविषयो, निसर्गाधिष्ठीत जीवनशैलीविषयी, जन्म, मृत्यू आदी गूढ गोष्टींचे कोडे शब्दबद्ध, तालबद्ध, किंवा चित्रबद्ध करणाऱ्या आदिवासो कलाप्रकाराविषयी कुतूहल निर्माण झाले. कालप्रवाहातील भौतिक सुधारणाच्या प्रभावात आदिवासी व गैरआदिवासी यांच्यातील परस्पर आंतरखक्रियांमधून 'आदिवासी साहित्य' ही संकल्पना आकारास येत आहे.

आदिवासी साहित्याबद्दल अशी व्यापक भूमिका घेत असतानाच अभ्यासकांची मते लक्षात घेतली पाहिजेत. डॉ. गोविंद गारे यांच्या मते, बिगर आदिवासी साहित्यिकांच्या उपलब्ध साहित्यास आदिवासी साहित्य म्हणता येणार नाही कारण ग्रामीण व दलित अशी छाप घेऊन आलेल्या या साहित्यात आदिवासींचे खऱ्याखुऱ्या जीवन-संस्कृतीचे दर्शन होत नाही. सुरुवातीला ग्रामीण, दलित साहित्याच्या चळवळींकडून आदिवासींच्या खूप अपेक्षा होत्या, परंतु हे साहित्य गावकुसाबाहेर गेलेले नाही, असे दिसल्यावर आदिवासींना

स्वतंत्र व्यासपीठाची आवश्यकता भासू लागली. दलित व बहूजन समाजाची जी व्यासपीठ निर्माण झाली, त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन आदिवासी साहित्याची चळवळ सुरू झाली. स्वतःची अस्मिता जपण्यासाठी 'आदिवासी साहित्य परिषेदची' स्थापना झाली. आदिवासी जीवन प्रत्यक्ष जगलेले काही सुशिक्षित आदिवासी तरुण आपले स्वत: चे साहित्य लिहू लागले.

डॉ. विनायक तुमराम यांना आदिवासी साहित्य हा मराठी साहित्याचा प्रवाह आहे हे मान्य नाही. त्यांच्या मते आदिवासी साहित्य ही कोणत्याही साहित्याची प्रतिकृती नाही. कारण ते स्वतंत्र, स्वयंभू व स्वयंसिद्ध असून त्याच्या प्रेरणा आदिम आहेत. आदिवासी साहित्य हे या देशातीलच नव्हे तर अखिल विश्वातील मूळ मानवसमूहांचे आहे. या साहित्याला उज्ज्वल भवितव्य असल्याचे सांगून, खास वैशिष्ट्ये आणि भाषिक व सांस्कृतिक वेगळेपण जपणाऱ्या या साहित्याचे स्वतंत्र भाषाशास्त्र, साहित्यशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र निर्माण व्हावे अशी त्यांची आग्रही भूमिका आहे.

संस्कृती संघर्षात आदिवासी संस्कृती कोणत्या टप्प्यावर आहे हा संशोधनाचा विषय असला तरी एक गोष्ट मात्र निश्चित की, पृथ्वीच्या पाठीवरील आदिवासी हेच मूळनिवासी आहेत. त्यांच्या साहित्यातील आदिम तत्त्व किवा आदिबंध हेच खरे त्या साहित्याचे वेगळेपण आहे, असे आदिवासी साहित्याचे अभ्यासक मानतात. त्यामुळे आदिवासींचा आदिम इतिहास केवळ त्याच्या अभिनिवेशाचा विषय नसून आदिवासी साहित्यामागील प्रेरणेचा मूलभूत व वास्तव मुद्दा आहे.

उपलब्ध मानवी इतिहासाच्याही पूर्वी ज्यांची पावले या भूमित रोवली गेली ते आदिवासी येथील मूळनिवासी होत. तेच जल, जंगल व जमीन यांचे 'मूळधनी' होत. आदिवासींना संपन्न सांस्कृतिक वारसा व इतिहास लाभला आहे. एकेकाळी हा समाज भाषा-साहित्य-कला या क्षेत्रात पुढारलेला आणि शस्त्र-शास्त्रांचा निर्माता होता, असे डॉ. तुमराम यांना वाटते. निसर्गसात्रिध्य, सांस्कृतिक संपन्नता व धार्मिक आदिबंध याबरोबरच आदिवासींचा गौरवशाली इतिहास ही त्यांना आदिवासी साहित्याची एक प्रेरणा आहे असे वाटते. त्यांच्या मते, आदिवासींना वैभवशाली गौरवी इतिहास आहे. समग्र मानवी इतिहासात, आदिवासींच्या ऐतिहासिक कर्तृत्वाचे फार थोडे धागे हाती लागत असले, तरी त्यामुळे आदिवाीसीचा खरा इतिहास पुसला जाऊ शकत नाही.

आदिवासी वीरांच्या ऐतिहासिक कर्तृत्वाचा परिचय आदिवासी साहित्यिकांना फार मोलाचा आहे. त्यांनी मुक्तीसाठी केलेले लढे आदिवासी साहित्यासाठी प्रेरणास्त्रोत आहेत. हे लढेच प्रेरणास्थान आहेत. या संघर्षाला अनेक बाजू आहेत. एकाच प्रकारच्या समाजिक वेदनेतून त्यांचा विद्रोह जन्माला आलेला नाही. आदिवासींनी आत्मसन्मानाच्या जशा

चळवळी केल्या तशाच त्या धर्म-संस्कृतीवर होणाऱ्या परकीय आक्रमणाविरुद्ध केल्या. शोषण आणि विषमतेविरूद्ध केल्या. हे लक्षात घेतले तर आदिवासींच्या अस्मितेचे व त्यांच्या संघर्षशील प्रवृत्तीचे दर्शन घडते. ही जाणीव आजच्या आदिवासी लेखकांना प्रेरक आहे. डॉ. तुमराम म्हणतात, ज्यांच्या चिंतनातून पूर्वजांचा गतकालीन इतिहास वजा होतो, त्यांच्या लेखणीतून उतरणारे साहित्य हे चेतनाहीन व संदर्भशून्य असते. प्रेरणाहीन असते. नव्या पिढीला नवे बळ देण्याची क्षमता अशा साहित्यात नसते. साऱ्याच ऐतिहासिक घटनांची वस्तुनिष्ठ दखल घेण्यावरच आदिवासी साहित्याची समृद्धी अवलंबून आहे. भूतकाळ समोर ठेवून वर्तमानात लेखन झाले पाहिजे. आदिवासी संघर्षाच्या प्रेरणा शोधल्या पाहिजे. त्या आदिवासी साहित्याच्या खऱ्याखुऱ्या प्रेरणा ठरतील.

श्रीमती उषाकिरण आत्राम म्हणतात, भारताच्या समृद्ध भूप्रदेशातील आदिवासी हेच मूळनिवासी होत. या मूळनिवासींची भाषा-लिपी, धर्म-संस्कृती ही आर्यांच्या आक्रमणाममुळे नष्ट झाली. आदिवासीत वर्णव्यवस्था नाही. समता, बंधुत्व, निसर्गपूजा हीच जीवनमूल्ये आहेत. आर्य पुरुषप्रधान तर आदिवासी मातृशक्तीचे पूजक आहेत. आदिवासींचे देव कपोलकल्पीत नाहीत. निसर्ग व वंशज अशी त्यांची वस्तुनिष्ठ दैवतं आहेत. पंधरा हजार वर्षांचा इतिहास लाभलेल्या या संस्कृतीची स्वावलंबन, सहकार, इनामदारी, सत्यवाद, साम्यवाद, निसर्गवाद व स्वतंत्र जीवनपद्धती ही वैशिष्ट्ये आहेत. हाच आदिवासींचा गौरवशाली भूतकाळ आहे, असे त्यांना वाटते.

आदिवासींचे जीवन आणि त्यांच्या नैसर्गिक हक्काच्या संदर्भात मराठीत स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच कादंबरीनिर्मिती झाल्याचे दिसते. वारली, कातकरी, पावरी, डांगी, ठाकर, कोरकू आणि गोंड माडिया या जमातींवरील साहित्य प्रसिद्ध आहे. यातून त्यांची जीवनशैली, त्यांच्या रूढीपरंपरा, निसर्ग आणि बाह्य संस्कृतीशी त्यांचा चाललेला संघर्ष, वने, राष्ट्रीय उद्याने, महसूल, पर्यावरण या संदर्भात शासकीय धोरणे आणि आदिवासी जीवन, नक्षलवाद अशा अनेक संदर्भात प्रश्नांचा वेध या कादंबरीकारांनी घेतला आहे. नक्षलवाद्यांच्या संदर्भात प्रा. सुरेश द्वादशीवार यांची हाकुमी व ॲड. एकनाथ साळवे यांची एन्काऊंटर या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. तंट्याभिल्ल ही बाबा भांड यांची अलीकडची कादंबरी आदिवासींच्या संदर्भातील बहुविध जाणिवांना जन्म देणारी ठरली आहे.

आदिवासींच्या अनेक प्रश्नांपैकी 'नक्षलवाद' हा एक सध्या महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नांसह देशातील डाव्या चळवळी, पर्यावरणाचा प्रश्न, मानवी हक्कांचा प्रश्न, स्थलांतराचा प्रश्न, या सर्व एकमेकांत गुंतलेल्या प्रश्नांचा आविष्कार करणाऱ्या कादंबऱ्या अलीकडे प्रसिद्ध झाल्या आहेत. आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांसाठी नक्षलवादी प्रामाणिकपणे

कार्यरत आहेत, की चळवळीचे औचित्य संपल्याने आपल्या उरल्यासुरल्या अस्तित्वासाठी नक्षलवादी आदिवासींच्या जगत आहे, अशा प्रकारची भावना आज या नव्या कादंबऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे.

आदिवासी कादंबरीच्या संदर्भात प्रयत्न अतिशय क्षीण असल तरी आदिवासींच्या जीवनातील वर्तमान समस्यांची गुंतागुंत आणि व्यामीश्रता या कादंबऱ्यांनी बऱ्याच अंशी व्यक्त केली आहे. कविता हा कोणत्याही वाङ्मयीन जाणिवेचा आद्य उद्गार असतो. अत्यंत दाहक अनुभूती पण थेट रूपात व्यक्त करण्याचे सामर्थ्य अर्थातच आदिवासी कवितेनेही सिद्ध केले आहे. दलित साहित्याप्रमाणेच आदिवासी कवींनीही आपल्या अस्तित्वाचा शोध जोरकसपणे कवितेतून घेतला आहे. पण आदिवासी जाणिवांची एकप्रकारे चळवळ निर्माण करण्याचे श्रेयही या कवितेकडेच जाते. कारण कविता हा आकाराने लघु असलेला प्रकार नियतकालिकांच्या माध्यमातून दूर पाहोचतो. अस्सल आणि मौलिक भावना व विचार कोणत्याही सुबुद्ध माणसाला त्वरित विचारप्रवृत्त करतात. म्हणूनच वाहरू सोनवणे, विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, उषाकिरण आत्राम, दशरथ मडावी आणि कृष्णकुमार चांदेकर हे परस्परांपासून दूर दूर अंतरावर राहत असूनही या सगळ्यांच्या कवितांतून वाहणारी आदिवासींच्या व्यथांची वेदना आणि अस्मितेची ज्वाला गेल्या पंधरा वीस वर्षात एकाच दिशेने एकवटल्या गेली. त्यातूनच चळवळीला आकार येऊ लागला. या कवितांमधूनच बिरसा मुंडासारख्या नव्या मिथ्स आदिवासी कवितेतूनच आता उजागर होत आहेत.

कवी भुजंग मेश्राम यांची 'पांडवानी' ही तिज्जनबाईला उद्देशून लिहीलेली एकच कविता उदाहरणादाखल घेतली तरी आदिवासी कवितेतील आशयसूत्रांची व्यामीश्रता जाणवते.

तू कंच्या भारताबद्दल बोलते आहेस?
बाजारात ससे होले विकताना
तुझ्याजवळ नव्हता तराजू काटा
अख्या छत्तीसगडात भारोभार सौदा
मीठ मिरची असो की दुसरं काही-
बहुदा याच देण्याघेण्यात
तुझ्या ओटीत पडली असावी पांडवानी
तिथून तुझ्या कथेची सुरवात झाली.
'पारधीनबाई तुझ्या ओटीत काय?'
गावठी भोंगळ्या पोऱ्याही
विचारू शकतो बाजारभाव

म्हणून खोचलास कमरेला पदर
खांद्यावर गदेसारखी एकतारी
अन् रंगल्या तोंडातून रांगडी छत्तीसगडी
मांडी ठोकून तुझी गर्दीत घेतलेली उडी
ती कड्यावरची आत्महत्त्या की
लांब उंच स्पर्धेतील उडी होती?
पारावर रंगल्या पुसाड्या बातम्या
तशा तुझ्या ओठावर लोककथा
तुझ्या गीतातून खांडववन पेटताना
उपाशी लोकही बसत नाही
गप्पअशा स्थितीत टाळ्या रप्प रप्प रप्प!.....
संस्कृती लुटताना ज्यांनी ठेवले फक्त अवशेष
आज तेच बांधतायेत म्युझियम्स्
पांडवानी गाता गाता तू झालीस द्रौपदी
स्वतःच्या गळ्यानेच फेडतेस
अभयारण्याची हिरवी साडी;
व्यवस्थेशी केवळ फुगडी खेळून उपेग नाही.
ती तर आहे मुलखाची लज्जा गौरी;
तुझ्याबद्दल आता काहीच बोलणार नाही तिज्जनबाय
तू कंच्या भारताबद्दल बोलते आहेस?

गेल्या शतकातील आदिवासी कवितांचा अत्यंत साक्षेपी आढावा डॉ. विनायक तुमराम यांनी त्यांच्या 'शतकातील आदिवासी कविता' या ग्रंथातून घेतला आहे.

एकूणच वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारातील आदिवासी मराठी साहित्यातून वेगवेगळ्या परिसरातील आदिवासींचे जीवनचित्र पुढे येत आहे. भामरागड, मेळघाट, ठाणे जिल्हा अशा परिसरातील पर्यावरणाशी नैसर्गिकरीत्या तेथील आदिवासी जीवनाच्या सर्व पातळीवर कसे एकरूप आहेत, त्यांचे धार्मिक, सामाजिक जीवन, जेवण्या-राहण्याच्या पद्धती आणि नीतीमूल्ये भोवतालच्या परिस्थितीतूनच कसे उत्क्रांत झालेली आहेत, असे मौलिक मुद्दे तरुण आदिवासी लेखक मांडत आहेत. औद्योगिकरणाच्या प्रक्रियेतून तथाकथित 'विकास' पावलेल्या नागर समाजाच्या संपर्कामुळे आदिवासींचे निसर्गनिष्ठ जीवन एका नव्या संघर्षात सापडले आहे. हा सघर्ष अपरिहार्य आहे का, त्याचे कोणते अनुकूल-प्रतिकूल परिणाम होणार आहेत आणि या संदर्भात आदिवासीची भूमिका कोणती असायला हवी, हे

आज सामाजिक विचारवंतांना भेडसावणारे प्रश्न आहेत. या प्रश्नांबद्दल आदिवासीमधील अभ्यासकांमध्ये आणि विचारवंतांमध्येसुद्धा एकमत नाही. पण या प्रश्नांचा आदिवासी मराठी साहित्याची निर्मिती करणाऱ्या लेखकांनी अनुभवाच्या पातळीवर कथात्मक आविष्कार कसा केला आहे, याचे एक ठोकळमानाने दर्शन घडावे या उद्देशाने आदिवासी मराठी साहित्य या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते.

आदिवासींच्या संदर्भातील लेखकांचे अनुभवक्षेत्र असे विविध असले तरी अद्यापी अनेक क्षेत्रे मराठी साहित्याच्या संवेदनक्षेत्राच्या बाहेरच आहेत. एका बाजूला आदिम इतिहासाची अस्मिता ही प्रेरणा आहे, तर दुसरीकडे प्रचंड दारिद्र, निरक्षरता, शोषण आणि मानवी मूल्यांपासून वंचना हेही वास्तव आहे. या ग्रंथातील माधुरी साकुळकर यांचा आदिवासी स्त्रियांच्या संदर्भातील क्षेत्रीय अभ्यास या दृष्टीने महत्त्वाचा आहे. मध्यप्रदेश व छत्तीसगड प्रांतातील आदिवासी पुरुष उदरनिर्वाहासाठी मुंबई, महाराष्ट्रात जातात. त्यामुळे स्त्रियांची परवड होते.

**संदर्भ ग्रंथ:**

१) डॉ. गोविंद गारे : आद्य आदिवासी सेवक ठक्कर बापा, मार्च १९८७
२) व्यंकटेश आत्राम : गोंडी संस्कृतिचे संदर्भ, श्रीकृष्ण उबाळे प्रका, प्र.आ. १५ जाने. १९८९
३) डॉ. विनायक तुमराम, आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समी १९९४
४) डॉ. विनायक तुमराम गॉड, गोंडबुरूड व थोटी : वास्तव आणि वाट २००२
५) सुधीर फडके, महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे. १९६३